विभागातील अधिकारी/कर्मचारी व रास्तभाव दुकानदार यांचे तांत्रिक प्रशिक्षणासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
क्रमांक: संकीर्ण-२०२६/प्र.क्र.११/संगणक कक्ष
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दि.२० नोव्हेंबर, २०२६

वाचा :-

१) उद्योग, ऊजा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग III/उद्योग-४, दि. ०१ डिसेंबर, २०१६.
२) शासन निर्णय, अन्न नागरी पुरवठा विभाग क्र.खरेदी-२०२४/प्र.क्र.०२/नोंदणी शाखा, दि.२९.०२.२०२४.
३) नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांचेकडील दि.०९.१२.२०२५ रोजीचे पत्र.
४) राज्यस्तरीय प्रशासकीय विभाग खरेदी समितीचे दि.३०.१०.२०२६ रोजीचे इतिवृत्त.

प्रस्तावना :-

विभागातील AePDS, RCMS, IAeSCM प्रणाली, ई-केवायसी मोहिम व अपात्र लाभार्थ्यांची पडताळणी करण्याकरीता मिशन सुधार कार्यक्रमाची अंमलबजावणी करतांना क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी व रास्तभाव दुकानदार यांना तांत्रिक अडचणी येत असल्याने विभागातील अधिकारी/कर्मचारी व रास्तभाव दुकानदार यांची तांत्रिक कार्यक्षमता वाढविणे आवश्यक असल्याबाबत नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांनी संदर्भ क्र.३ येथील दि.०९.१२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अहवाल सादर केला आहे.

अधिकारी/कर्मचारी व रास्तभाव दुकानदारांचे तांत्रिक प्रशिक्षण आयोजित केल्यास विभागातील विविध पोर्टलवरील माहितीचे योग्य विश्लेषण करून सदर ज्ञानाचे दैनंदिन कामकाजामध्ये निर्णय क्षमता विकसीत होण्यास मदत होणार आहे. तसेच कामकाज वेगवान व त्रुटीविरहितरित्या करणे शक्य होणार आहे. विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षणाबाबतचा मुद्दा विभागाच्या "विकसीत महाराष्ट्र-२०४७" मध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय दि.०१.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीबाबतीची प्रक्रीया राबविण्याकरीता कार्यपद्धतीची नियम पुस्तीकेतील तरतूदीनुसार संदर्भ क्र.०२ येथील दि.२९.०२.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये विभागामध्ये राज्यस्तरीय प्रशासकीय विभाग खरेदी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची बैठक दि.३०.१०.२०२६ रोजी आयोजित करण्यात आली. सदर बैठकीमध्ये विभागातील अधिकारी/कर्मचारी व रास्तभाव दुकानदार यांच्याकरीता तांत्रिक

प्रशिक्षणासाठी संस्था/पुरवठादार यांची निवड करण्याबाबत अटी व शर्तीना तसेच त्याकरीता येणाऱ्या अंदाजित रू.९.९२ कोटी (अक्षरी रू. नऊ कोटी ब्याणव्व लक्ष) (करांसह) खर्चास मान्यता देण्यात आली. त्यानुसार सदर खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

राज्यस्तरीय प्रशासकीय विभाग खरेदी समितीने संदर्भ क्र.०४ येथील दि.३०.१०.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या मान्यतेनुसार खालील अटींच्या अधिन राहून अधिकारी/कर्मचारी व रास्तभाव दुकानदारांचे तांत्रिक प्रशिक्षण आयोजित करण्याकरीता येणाऱ्या अंदाजित रू.९.९२ कोटी (अक्षरी रू. नऊ कोटी ब्याणव्व लक्ष) (करांसह) एवढया खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. शासकीय विभाग/संस्थानी करावयांच्या खरेदीसाठी नियमपुस्तीका संदर्भ क्र.०१ येथील शासन निर्णयान्वये उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांनी निश्चित केली आहे. सदर नियमपुस्तीकेनुसार तांत्रिक प्रशिक्षणासाठी संस्था/पुरवठादार यांची निवड शासनाच्या mahaetendor.com या पोर्टलद्वारे ई-निविदा पद्धतीने करण्यात येईल.

३. प्रस्तुत बाबीकरिता होणारा खर्च लेखाशिर्ष "मागणी क्र. एम-३, ३४५१, सचिवालयीन आर्थिक सेवा, ०९०, सचिवालय, (००) (०६), सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण (राज्य योजना) (कार्यक्रम), (३४५१A०७३)- २०- इतर प्रशासकीय खर्च" मध्ये उपलब्ध तरतुदीतून अनुदानातून भागविण्यात येईल. तसेच वरील खर्च शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाच्या आधीन राहून खर्च करण्यात येईल व वित्तीय बाबींच्या अनुषंगाने लागू असणाऱ्या सर्व तरतुदींचे पालन करण्यात येईल.

४. सदर आदेश वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०२६/प्र.क्र.२२/विनियम, दि.११.०८.२०२६ रोजीच्या परिशिष्टामधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील भाग - १, उपविभाग-४, अनुक्रमांक ९ अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२६११२०१५४२३८७००६ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

SANTOSH UMESHRAO GAIKWAD

Digitally signed by SANTOSH UMESHRAO GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=1D60828C41033AB1DA6D64EF17879745D578B334C05C1E8151EF933F134060BC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BC8833F9E213A7E4DFB9D2B071C9202EA52A04054E53B0C1BBF9E50C90A2CF5C, cn=SANTOSH UMESHRAO GAIKWAD
Date: 2026.11.20 18:15:22 +05'30'

(संतोष गायकवाड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. विरोधी पक्षनेते (विधानसभा / विधान परिषद), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२. सर्व सन्मानीय विधानसभा / विधान परिषद सदस्य,
३. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण विभाग) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

५. मा. उपमुख्यमंत्री (रा.ऊ.शु. क्रिडा व अल्पसंख्याक विभाग) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव,
७. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा मुंबई,
९. वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई,
१०.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर,
११.महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
१२.अधिदान व लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१३.निवासी लेखा परीक्षा अधिकारी ,मुंबई
१४.सर्व उप आयुक्त (पुरवठा),
१५.सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी,
१६.सर्व अन्न धान्य वितरण अधिकारी,
१७.सर्व उपनियंत्रक (शिधावाटप) मुंबई/ठाणे
१८.निवडस्ती (संगणक कक्ष).